# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व. ता. जि. ठाणे.

Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट** क्र ०२/२२ दिनांक: ०१.०१.२०२२

## अवैध अग्निशस्त्रे विक्रीसाठी घेवून आलेल्या इसमास ०८ गावठी पिस्टल, ०८ मॅग्झीन व १४ जिवंत काडतुसांसह अटक- नयानगर पोलीस ठाण्याची कामगिरी.

दिनांक २८/१२/२०२१ रोजी नयानगर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र वनकोटी यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मध्यप्रदेश येथे राहणारा एक इसम पुनमसागर रोड, मिरारोड पुर्व येथे गावठी कट्टे (पिस्टल) विक्रीसाठी आणणार आहे. सदर मिळालेल्या गोपनीय माहितीचा आशय पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - १ यांना सांगितला असता त्यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे वपोनि. जितेंद्र वनकोटी यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि. प्रणय काटे व पोलीस पथकाने सदर ठिकाणी सापळा रचुन शिताफिने संशईत इसम नामे नरेश मोहन देशमुख वय ३८ वर्षे रा. हनुमान मंदिराजवळ तलाव जवळ, कटंगी, ता. जि. बालाघाट, मध्यप्रदेश यास ताब्यात घेतले. सदर संशईताकडे प्राथमिक विचारपुस करता तो उडवाउडवीची उत्तरे देत असल्याचे निदर्शनास आल्याने त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याचे ताब्यात ०५ देशी बनावटीचे पिस्टल, ०५ मॅक्झीन व ०८ जिवंत काडतुस मिळून आले. त्याबाबत आरोपी नामे नरेश मोहन देशमुख, वय ३८ वर्षे याचे विरुध्द नयानगर पोलीस ठाणे येथे गु. रजि. नं. I ७१९/२०२१ भा.ह. का.कलम ३/२५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१), ३७(३), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन मा. न्यायालयाने आरोपीची दि. ०७/०१/२०२२ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड दिलेली आहे.

सदर गुन्हयाचे पुढील तपासादरम्यान नयानगर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे पथकाने कौशल्यपुर्ण तपास करुन आरोपीकडून प्राप्त माहीतीचे आधारे अेबी रोड, डेबनदी थान, जुलवानीया, जि. बडवानी, मध्यप्रदेश येथून आणखीन ०३ देशी

बनावटीचे पिस्टल, ०३ मॅक्झीन व ०६ जिवंत काडसुते हस्तगत केलेले आहेत. अशा प्रकारे आरोपी नरेश मोहन देशमुख याचेकडून संपुर्ण तपासादरम्यान ०८ गावठी पिस्टल, ०८ मॅग्झीन व १४ जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आलेली आहेत. सदर गुन्हयाचा अधिक तपास पो.नि. जिलानी सय्यद हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी श्री. अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - १, श्री. शशिकांत भोसले, सहायक पोलीस आयुक्त, नवघर विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. श्री. जितेंद्र वनकोटी, प्रभारी अधिकारी नयानगर पोलीस ठाणे, सपोनि/प्रणय काटे, पोउनिरी/आशुतोष चव्हाण, पोहवा/९१०८८ पाटील, पोना/००२८ पठाण, पोना/०६०३० संधू, पोशि/१००१८ मुलानी, पोशि/१००५२ खामगळ, पोशि/१००३१ केंद्रे यांनी केलेली आहे.